



# आंबोली पर्यटन माहिती पुस्तिका

## 2023





**ग्रामपंचायत आंबोली, ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग**



# Amboli TOURISM

## DMC - Amboli & Konkan

Rooms Booking | Car Rent | sightseeing | Adventure Activities
Nature Trails | Biodiversity Camps
Wildlife | Night Activities | Tent Camping | Cultural Activities
Campfire | Photography | Events
Guide | Travel | Package Tour & More

• Eco Tourism • Adventure Tourism • Agro Tourism • Village Tourism
• Wildlife Tourism • Cultural Tourism • Medical Tourism • Jungle Tourism Jungle Safari
• Recreational Tourism • Wellness Tourism • Night Tourism • Corporate Tours • Events & Etc
Solo Tour | Couple Tour | Family Tour | Group Tour & More !



**Nirnay Raut**

Contact Us (WhatsApp) : +91 7030418700 | 7218703016

Amboli Tourism, Amboli (Sindhudurg - MH)

www.ambolitourism.com

# * महत्वाच्या राजकीय व्यक्ती *



**मा. नरेंद्र मोदी**
पंतप्रधान



**मा. नारायण राणे**
खासदार, केंद्रिय मंत्री



**मा. विनायक राऊत**
खासदार, सिंधुदुर्ग



**मा. एकनाथ शिंदे**
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



**मा. देवेंद्र फडणवीस**
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



**मा. अजित पवार**
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

# * महत्वाच्या राजकीय व्यक्ती *



**मा. रविंद्र चव्हाण**
सार्व. बांधकाम मंत्री तथा पालकमंत्री, सिंधुदुर्ग



**मा. दिपक केसरकर**
शालेय शिक्षण मंत्री महाराष्ट्र राज्य



**मा. निरंजन डावखरे**
आमदार



**मा. अनिकेत तटकरे**
आमदार



**मा. ज्ञानेश्वर म्हात्रे**
आमदार

# * महत्वाचे अधिकारवर्ग *



**श्रीम. के. मंजुलक्ष्मी**
जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग



**श्री. प्रजित नायर**
मुख्य कार्यकारी अधिकारी



**श्री. सौरभकुमार अग्रवाल**
पोलीस अधिक्षक, सिंधुदुर्ग



**श्री. नवलकिशोर रेड्डी**
उपवनसंरक्षक, सिंधुदुर्ग



**श्री. सुशांत पानवेकर**
उपविभागीय अधिकारी, सावंतवाडी



**श्री. श्रीधर पाटील**
तहसिलदार, सावंतवाडी



**श्री. वासुदेव नाईक**
गटविकास अधिकारी, सावंतवाडी

# * ग्रामपंचायत आंबोली *



श्री. संदिप गंगाराम गोसावी
ग्रामविकास अधिकारी



श्री. सदाशिव वसंत नार्वेकर
उपसरपंच



सौ. सावित्री वामन पालेकर
सरपंच



श्री. महेश वासुदेव पावसकर
सदस्य



श्री. शंकर धोंडी चव्हाण
सदस्य



श्री. दिपक रामचंद्र नाटलेकर
सदस्य



श्री. काशिराम मालू राऊत
सदस्य



सौ. सारिका संदीप गावडे
सदस्य



सौ. साक्षी संतोष गावडे
सदस्य



सौ. छाया सुनिल नार्वेकर
सदस्य



सौ. स्वप्नीता गजानन कर्पे
सदस्य



सौ. निधी निखिल गुरव
सदस्य

# * मनोगत *



**सौ. सावित्री वामन पालेकर**
**सरपंच**
Bachelor of Arts
Modern Service Based on Tourism (MCED)

सस्नेह नमस्कार......

आंबोली गावामध्ये काम करताना तुम्हा सर्वांचीच आमच्या कुटुंबाला नेहमी साथ लाबली, याबद्दल सुरुवातीलाच आपणा सर्वांचे आभार.

तुम्हा सर्वांच्या साथीने आंबोलीतील सार्वजनिक, सामाजिक, पर्यटन विषयक, आरोग्य विषयक, शैक्षणिक अशी कामे आम्ही करत आहोत.

माझ्या या वाटचालीस तुम्हा सर्वांचे प्रेम, आशीर्वाद आणि साथ पुढेही लाभेल असा मला विश्वास आहे.

प्रत्येक लोकप्रतिनिधीने समाजातील सर्वात शेवटच्या व्यक्तीपर्यंत विकास कसा पोहोचेल या दृष्टीने काम करायला हवे. हा अंत्योद्याचा मार्ग आदरणीय पंडीत दीनदयाळजी उपाध्यांनी दाखवला होता. त्याना अनुसरुन काम करण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न करत आहे.

त्याचसोबत देशाचे पंतप्रधान मा. श्री. नरेंद्र मोदीजींनी दिलेले सूत्र "सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास, सबका प्रयास" याचे अनुसरण करण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न करत आहे.

नाविन्यपूर्ण कल्पनांच्या आधारे आंबोलीतील पर्यटन क्षेत्राचा विकास व येणाऱ्या अमृतकाळाचे साक्षीदार आपण होऊया.

धन्यवाद !

आंबोली : जीवंतपणे तुम्ही स्वर्ग पाहिला आहात का कधी? मग हाच स्वर्ग पाहावयाचा असेल तर वर्षा पर्यटन हंगामासह इतर पर्यटन हंगामात 'आंबोली'ला नक्की भेट द्या! अन् जीवंतपणे खरा - खुरा असा मनमुराद अविस्मरणीयच जणु असलेला स्वर्ग अनुभवा! असे अद्भुत आंबोली'चे वर्णन हे प्रसिद्द अभिनेते माधव अभ्यंकर म्हणजेच सर्वांचे लाडके अण्णा नाईक (मालिका - रात्रीस खेळ चाले) करतात. श्री. अभ्यंकर यांनीही पत्नी रेखा यांच्यासह आंबोली पर्यटन प्रत्यक्षात अनुभवल्यावरच हाच तो स्वर्ग असेही आवर्जून म्हटले आहे. हेही विशेष आहे. तसेच दरवर्षी आंबोलीला असंख्य पर्यटक हे आता भेट देतात. तर वर्षा पर्यटन हंगामात आंबोलीला भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्या ही लाखात असते. तसेच आंबोली घाट मार्गे गोवा - मालवण/तारकर्ली (महाराष्ट्र - कोकण) - कर्नाटक असा प्रवास करणारे पर्यटक तथा प्रवासी यांनासुद्धा आंबोलीतील अद्भुत निसर्गाची किमया पाहून अतिशय रोमांचित अशी अविस्मरणीय अनुभूती होते. असेच काही.

दरवर्षी देशातील सर्वाधिक पाऊस पडणाऱ्या ठिकाणांपैकी एक तसेच महाराष्ट्राची चेरापुंजी अशी ओळख असलेले सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी तालुक्यातील एकमेव असे हिलस्टेशन म्हणजेच 'आंबोली' ठिकाण होय. जागतिक वारसास्थळ असलेल्या सह्याद्री - पश्चिम घाटातील जैवविविधतेच्या प्रमुख हॉट - स्पॉट पैकी एक असलेले हे आंबोली ठिकाण! आंबोली हे पर्यटनस्थळ समुद्र सपाटी पासून साधारण ६९० मीटर उंचीवर वसलेले आश्चर्यकारक ठिकाण असून आकर्षित करणारे नयनरम्य हिरव्यागार दऱ्या, डोंगर आणि विस्तृत वनौषधी युक्त जंगल तथा जैवविविधता यामुळे आंबोलीला एक वेगळे आणि विशेष महत्व देखील आहे. तर अरबी समुद्रातील वारे हे आंबोलीला थेट धडकतात्. हेही एक विशेष! अरबी समुद्र किनारा हा आंबोली पासून सुमारे ५५ किमी अंतरावर आहे. तसेच आंबोलीसह आंबोली घाटाला सुद्धा पुरातन ऐतिहासिक महत्त्वही तर आहेच. तसेच सर्व बाबतीत मुख्य केंद्र हे नेहमी 'आंबोली' आजवर राहिले आहे. अगदी ब्रिटिश साम्राज्याला सुद्धा आंबोलीने त्याकाळी भुरळ घातली होती. त्यामुळे पूर्वीपासूनच आंबोली हे अद्भुत हिल स्टेशन म्हणून ओळख या ठिकाण'ची आहे. आंबोलीचे व्यापारिक दृष्ट्या महत्व हेही अतिशय मोठे असल्याने सुमारे १५५ वर्षापूर्वी ब्रिटिशांनी गोवा आणि वेंगुर्ले बंदरातून बेळगाव (कर्नाटक) माल वाहतूक करण्याच्या हेतूने आंबोली घाटमार्ग त्याकाळी बांधलेला आहे. तो अद्यापही सुस्थितीत असून आपण पाहू शकता. ह्या घाटमार्गाचे २१ नोव्हेंबर १८६१ मध्ये काम सुरु होऊन नोव्हेंबर १८६९ ला हा घाटमार्ग प्रत्यक्षात सुरु झाला. या आधी आंबोलीत वर येण्यासाठी घाट पायथ्याशी असलेल्या पारपोलीमार्गे पुरातन पायवाट होती. अश्याच पायवाटा ह्या अजूनही पुरातन इतिहासाची साक्ष देत आहेत. यासोबत इतरही घाट तळातील गावांमधे तसेच गोवा, कुडाळ परिसरात जायला त्यावेळी महादेवगड पॉइंट परिसरातून विविध पायवाटा होत्या. तसेच ब्रिटिशकालीन जकातही आहे. तर ब्रिटिशांनी बांधलेला आंबोली घाटमार्ग हा महाराष्ट्र, कर्नाटक व गोवा यांना एकत्रित जोडनारा महत्वाचा घाटमार्ग आहे. तशी ओळख'ही आंबोली घाटाची आहे. नागमोडी वळणे, डोंगर, दऱ्या, जंगल, वन्यजीव, धुके आदी सर्वांचा आनंद घेत घाटमार्गातून प्रवास करणेदेखील एक अविस्मरणीय असा ठेवाच ठरतो. यासह त्याकाळी सावंतवाडी संस्थाच्या राज्यात आंबोली हे अतिमहत्वाचे ठिकाण असल्याने तसा विशेष महत्त्व हे आंबोलीला होते. अद्यापही संस्थानचा पुरातन राजवाडा येथे आहे. तर महात्मा गांधी यांनी देखील आंबोलीत आपल्या दांडी आंदोलन दरम्यान येथे काही दिवस वास्तव्य केलेले असल्याची नोंद आहे.

आंबोली परिसरात निसर्गाच्या अनमोल देणगीसह धार्मिक तसेच पुरातन महत्व आहे. आंबोली गावचे ग्रामदैवत हे श्री देवी माऊली देवस्थान आहे. बाजूलाच औदुंबराखाली श्री दत्तमंदिर येथे आहे. यासह श्री राम मंदिर, दत्त मंदिर (बाजारवाडी), हिरण्यकेशी महादेव मंदिर व नदीचा उगम, श्री लिंगदेव, राघवेश्वर स्वयंभु गणपती मंदिर, मारुती मंदिर आदी धार्मिक आणि पुरातन संस्कृतिच्या वारसा जोपासलेली वैशिष्टपूर्ण अशी ही मंदिरे आहेत. तर घाटमार्गातील सुरुवातीला पूर्वीचा वस मंदिर तर बेळगाव दिशेला जाणाऱ्या मुख्य मार्गावरच श्री नांगरतासकारी देवस्थान आहे. ही अत्यंत्य जागृत देवस्थाने अशी ख्याती आहे. आजही आंबोली परिसरात धार्मिक कार्यक्रमांसह

पुरातन परंपरा ह्याही आजच्या पिढीनेही जोपासलेल्या येथे पाहवयास मिळतात. तर प्रत्येक सणात येथे पुरातन संस्कृतीही पाहता येते. तसेच संस्कृतिसह पारंपारिक शेती सुद्धा येथे अजुनही केली जाते. आंबोली परिसरातील मुख्य चौकुळ व गेळे ही दोन गावे आहेत. ह्या तिन्ही गावांना अनन्य साधारण महत्व आहे. निसर्गाचे वरदान लाभलेली गावे असल्याने तथा अद्यापही पुरातन संस्कृतीचा पहावयास मिळत असल्याने सर्वांना आकर्षित करतात. आंबोली हे असे ठिकाण जिथे वर्षातील तिन्ही ऋतू मधे वैशिष्टपूर्ण विविधता पाहायला मिळते. उन्हाळा, पावसाळा व हिवाळ्यात येथील परिसर हा आपल्या अद्भुततेची अनुभूती देतो. त्यामुळे बाराही महिने येथे काही ना काही विविधता पाहता येते! तसेच बारमाही पर्यटनही होते.

पावसाळ्यात आंबोलीसह घाट परिसरात फेसाळणारे पांढरेशुभ्र उंच कड्यावरुन कोसळणारे विविध वैशिष्टपूर्ण आकर्षित करणारे असे अनेक धबधबे, घनदाट धुके, पूर्ण क्षमेतेने वाहणाऱ्या पवित्र हिरण्यकेशी नदीसह इतर नद्या, ओहोळ, सोसाट्याचा गारवायुक्त वारा, रोमांचित करणारा तसेच पावसाळ्यात आपली सर्व रूपे (मध्यम, जोरदार, मुसळधार, अतिवृष्टी इ.) दाखवणारा पाऊस, उत्साही करणारे आणि हवे हवेसे वाटणारे वातावरण पहावयास मिळतं. यासह पावसाळ्यात जैवविविधतेतील साधारण ते दुर्मिळ व अतिदुर्मिळ जीव, वनस्पती आदी विविध घटक यांचा सहजरीत्या असलेला वावर'ही आंबोली परिसरात आढळून येतो. तर दरवर्षी नव - नव्या विविध जीव व वनस्पती आदी विविध घटकांच्या प्रजातींचाही शोध लागत असतो. वर्षा पर्यटन हंगामात धबधब्यांसह निसर्ग पर्यटन, वन्यजीव पर्यटन, साहसी पर्यटन, कृषी पर्यटन, ग्रामीण पर्यटन, धार्मिक, खाद्य पर्यटन आदी यांचा एकत्रितरित्या आनंद ही येथे पर्यटकांना घेता येतो.

आंबोली परिसरातील निसर्ग, पाऊस, धुके आणि वातावरण हे नेहमी सर्वांना अद्भुत असे स्वर्गिय अनुभूती देत असते. दरवर्षी मॉन्सून दाखल झाल्यावर आंबोली परिसरात १ जून ते ३१ ऑक्टोबर या कालावधीत सरासरी ३०० ते ३५० इंच पासून होतो. तर साल २०१९ च्या अतिवृष्टीत जगातील सर्वाधिक पावसाची नोंद करण्यात आलेली. त्यावेळी सुमारे ४५० इंच (११५०० मिली) हून अधिक पाऊस कोसळला होता. तर अरबी समुद्र पासून ५५/६० किमीवर थेट डोंगर कड्यावर असल्याने नेहमी येथे सोसाट्याचा वारा, सर्व प्रकारातील पाऊस (अतिवृष्टी, जोरदार, मुसळधार, ढगफूटी) पाहता येते. पावसाळ्यात आणि हिवाळ्यात येथे प्रचंड थंडी असते. साधारण थंडीच्या दिवसात साधारण ८ अंशा पर्यंत तापमान खाली येते.

पावसाळ्यात निसर्ग सुंदर आणि स्वर्गिय तथा रोमांचित अनुभूती देणाऱ्या ह्या आंबोली परिसराला दरवर्षी वर्षा पर्यटन हंगामात लाखो पर्यटक हे भेट देतात. वर्षा पर्यटनासह येथे निसर्ग व वन्यजीव पर्यटन ही करता येत असल्याने देश - विदेशातील असंख्य पर्यटकांचे सध्या आंबोली हे फेवरेट डेस्टिनेशन बनले आहे. दरम्यान, दरवर्षी मॉन्सूनच्या आगमनानंतर पावसाळ्यात आंबोली मुख्य धबधबा प्रवाहीत झाल्यावरच आंबोली वर्षा पर्यटन हंगाम'ला खरी सुरुवात होते. पावसाळ्यात आंबोलीत आकर्षित करणारे मोठ-मोठे पांढरेशुभ्र फेसाळणारे अनेक धबधब्यांसह नयनरम्य सुंदर देखावे व दाट धुके, नागमोडी वळणांचा घाटमार्ग, विविध अद्भुत देखाव्यांनी भरलेली पर्यटनस्थळे आहेत. येथे निसर्गाची मुक्त हस्ते उधळण ही एक अद्भुत किमयाही पाहता येते. यासह पावसाळ्यात आंबोली परिसरातील अतिशय उत्साहीत आणि रोमांचित करणारे असे वातावरण आहे. त्याचा मनमुराद आनंद ही असंख्य पर्यटक घेतात. त्यामुळे अद्भुत आंबोली वर्षा पर्यटन'ची मोठी क्रेझही पर्यटकांत दिसत असते.

आंबोलीत वर्षा पर्यटन हंगामात अनेक पांढऱ्या शुभ्र फेसाळणाऱ्या धबधब्यांवर आंघोळ तसेच पावसात भिजल्यावर येथील टपरी वरचा गरमा गरम चहा, भाजलेली कणसे, वडापाव, साबुदाणा वडा, भजी आदी चाखण्याची मज्जा काही 'औरच' असते. तर कावळेसाद पॉइंटवर शेकडो फूट खोल दरीत कोसळणारे धबधबे आणि वाऱ्यामुळे त्या धबधब्यांचे रिव्हर्स येणारे पाणी (रिव्हर्स वॉटरफॉल) हेही एक निसर्गाची किमया येथे पाहणे पर्वणीच ठरते. हिरण्यकेशी तीर्थक्षेत्री पवित्र हिरण्यकेशी नदीचा उगम हा पूर्वे

कडूनच गुहांमधून होतो. नदीच्या उगमस्थानी शिवलिंग, श्री गणेश, हिरण्यकेशी देवी (गंगा) आहे. बाजूलाच श्री दत्त व गौमाता आहे. हा परिसर एक अद्भुत आध्यात्मकाची अनुभूति देतो. यासह महादेवगड पॉइंट वरून संपूर्ण आंबोली घाट, दऱ्या आणि जंगल पहाता येते. येथेही क्षणा - क्षणाला धुके, मेघ खाली उतरलेले आदी निसर्गाची किमया पाहायला मिळते. तसेच सनसेट पॉइंट्स, शिरगावकर पॉइंट्स, कावळेसाद पॉइंट, नांगरतास धबधबा, राघवेश्वर स्वयंभु गणपती मंदिर (हिरण्यकेशी नदीतील), परीक्षित पॉइंट, नारायण गड, सिध्देश्वर मंदिर, चौकुळ - कुंभवडेतील रोमांच भरवणारा बाबा धबधबा, पठारे आदी हेही प्रसिद्ध पर्यटनस्थळे आहेत. तसेच पावसाळ्यात आकर्षित करणारे वैशिष्ट्यपूर्ण विविध लहान - मोठे धबधबे'ही आंबोली परिसरात पहायला मिळतात. ह्या परिसराला जैवविविधता लाभल्याने निसर्गप्रेमी पर्यटकही मोठ्या संख्येने आंबोलीला भेट देत असतात. हे निसर्गप्रेमी पर्यटक व अभ्यासक हे आंबोलीतील जंगलातील दिवसा व रात्रीचे ट्रेल्स/ट्रेकिंग, सफारी मार्फत वन्यजीव, जलचर व उभयच यांचे विश्व अनुभवत फोटोग्राफी करतात. तर इको पर्यटन, साहसी पर्यटन, धार्मिक/पारंपरिक पर्यटन आदी सर्व पर्यटन सबंधित पर्यटन हे आंबोली परिसरात करता येते. पर्यटकांसाठी विविध सेवा आणि सुविधा येथे उपलब्ध आहेत. तसेच भविष्यात आवश्यकते नुसार इतर सुविधाही उपलब्ध केल्या जाणार आहेत. सध्या पर्यटकांच्या निवासासाठी स्थानिकांची सर्व सुविधायुक्त अशी हॉटेल्स व होम स्टे तसेच घरगुती जेवण/पदार्थ यांची रेस्टॉरंटही असून गाईड, कार रेंट सारख्या सेवाही उपलब्ध आहेत. स्थानिक प्रशासनही पर्यटकांना सोयी - सुविधा उपलब्ध करने तसेच पर्यटन हे नियोजित रित्या करण्यास उपाय - योजना ह्या राबवत असतात. आंबोलीत बस स्थानक असून सिंधुदुर्ग, कोल्हापुर, पुणे, बेळगाव (कर्नाटक) व गोवा करिता एसटी बस सेवा उपलब्ध आहेत. तर उपचारांसाठी आंबोली प्राथमिक आरोग्य केंद्र हे बस स्थानकालगतच आहे. तसेच पोलीस चेक पोस्ट, वनविभाग कार्यालय (RFO) व चेक पोस्ट, तहसीलचे तलाठी मंडळ कार्यालय येथे आहे. सोबत घाटमार्गात तसेच आंबोली परिसरात कोणतीही आपदा उद्भवल्यास मदतीस आंबोली आपात्कालीन पथकही कार्यरत आहे. त्यामुळे आंबोलीत आवश्यक सेवा सुविधाही उपलब्ध आहेत. तर चला मग स्वर्गिय अनुभूतिसाठी आंबोली पर्यटनाला वर्षा भरातील विविध पर्यटन हंगामात भेट देत रोमांचित आणि अद्भुत असा मनमुराद पर्यटनाचा अविस्मरणीय आनंद घेवूया.

### असे पोहचता येतं आंबोलीत...

- ४८० किमी एन एच ४८ (मुंबई - पुणे - सातारा - कोल्हापुर - उत्तुर - आजरा - आंबोली)
- मुंबई - गोवा हायवे - ५५० किमी (एन एच ६६)
- पुणे ते आंबोली - ३४५ किमी एन एच ४८ (पुणे - सातारा - कोल्हापुर - उत्तुर - आजरा - आंबोली)
- पुणे येथून एसटी महामंडळाच्या उत्तुर मार्गे बसेस उपलब्ध!
- कोल्हापुर ते आंबोली ११० किमी.
- मुंबई - पुणे येथून खाजगी बसेस उपलब्ध असून जवळचे शहर आजरा (उत्तुर मार्गे) तर मुंबई - गोवा हायवे ने सावंतवाडी शहर.
- जवळचे विमानतळ - मोपा (गोवा), चिपी (सिंधुदुर्ग), दाभोली (गोवा), बेळगाव (कर्नाटक)
- जवळचे रेल्वे स्टेशन - सावंतवाडी रोड

# - गेळे -





संह्यांद्रीच्या कुशीत, सावंतवाडी तालुक्यात आंबोली घाटमाथ्यावर वसलेलं, अगदीच कमी लोकसंख्येचं एक सुंदर, छोटेखानी गाव. गावातील बहुतेक लोक नोकरिधंदा व शिक्षणानिमित्त गावाबाहेर, म्हणजेच मुंबई, पुणे, नाशिक, सातारा,  कोल्हापूर, आदी अनेक शहरांत वास्तव्य करून असणारे, प्रत्येक सणासुदीला आवर्जून गावात उपस्थित राहणारे. आजघडीस गावातील दोन चार तरुण परदेशातही वास्तव्य करत आहेत हे विशेष.

श्री. देव रवळनाथ आणि आई श्री. सातेरी ही गावची प्रमुख दैवते. दोन्ही दैवतांची सुंदर आणि वेगवेगळी मंदिरे. अगदी अलीकडेच म्हणजे सन २०१६ साली श्री. देव रवळनाथांच्या मंदिराचा जिर्णोद्धार करण्यात आला. सोबत कलशारोहण सुद्धा करण्यात आले. त्याआधी तिन ते चार वर्षे ह्या मंदिराचे काम सुरू होते. गर्भगृह वगळून संपूर्ण मंदिर पाडण्यात आले. सारे गाव कामाला लागले. गावातील अबाल-वृध्द, लहान थोर, साऱ्यांनी कोणताही किंतू मनात न ठेवता आपले योगदान दिले. स्वतःला जमेल ते आणि समोर दिसेल ते काम प्रत्येकाने पार पाडले. हळू हळू पुढील  तिन वर्षात सुंदर मंदिर निर्माण झाले.

दिनांक ११ व १२ मे २०१६ ह्या दोन दिवसांत शुभ मुहूर्तावर मंदिराचा जिर्णोद्धार व कलशारोहण सोहळा, हे दोन्ही सोहळे विधिवत संपन्न झाले. पद्मविभुषण, महाराष्ट्रभुषण, शिवशाहीर, श्रीमंत. बाबासाहेब पुरंदरे ह्या पुजनीय आणि ऋषितुल्य व्यक्तिमत्वाच्या शुभहस्ते मंदिराचा कलशारोहण संपन्न झाला.

मंदिराचे जिर्णोद्धार व कलशारोहण सोहळे जरी संपन्न झाले तरी एक काम अजूनही बाकी होते, जे त्यावेळी राहून गेले होते. श्री. देव रवळनाथांचा चांदीचा मुखवटा काहीसा जीर्ण झाला होता आणि त्याची सर्व गावकऱ्यांना रुख रुख लागली होती. ठरले. चर्चा झाल्या, सभा झाल्या आणि लागलीच सारे गावकरी पुन्हा एकदा त्याच उत्साहात कामाला लागले. श्री. देवाचा सुरेख, सुंदर आणि रेखीव असा  चांदीचा मुखवटा तयार झाला.  दिनांक ०८ व ०९ मे २०२२ ह्या दोन्ही दिवशी शुभ मुहूर्तावर मुखावट्याचा संप्रोक्षण सोहळा विधिवत संपन्न झाला. वरील दोन्ही सोहळे याची देही याची डोळा पाहता आले, सारे गावकरी धन्य झाले, कृतकृत्य झाले.

अगदी पूर्वापार चालत आलेला एकोपा, एकविचार आजही कायम जोपासणारे, संह्याद्रीच्या कुशीत, पवित्र हिरण्यकेशी नदीच्या काठावर व नारायण गडाच्या अगदी जवळ वसलेलं, पंचक्रोशीत एक आदर्श गाव म्हणून ओळखलं जाणारं असं आमचं आदर्शवत गेळे गाव.  प्रत्येक गावकऱ्याला, गावातील लेकी-सुनांना व ईतर गावात नांदणाऱ्या माहेरवाशिणींना गावचा सार्थ अभिमान नसेल तर नवलच !!

# - चौकुळ -





हे गाव आंबोली लगतचे गाव आहे. हे गाव आहे गुहांचे, विविध रंगी फुलांच्या सड्यांचे, हे गाव आहे निसर्गातल्या विविध चमत्कारांचे! नेहमी धुक्यातच विरून गेलेले आणि हवेत असल्याप्रमाणे वावरणारे. तर पर्यटन दृष्ट्या जैवविविधतेसह दुर्लक्षित विविध पर्यटन स्थळे आहेत. जी ऐतिसाहिक आणि भारतीय संस्कृतिचे दर्शन घडवतात! तर नव नवे शोधही येथे लागत आहेत. तसेच या सैनिकी परंपरा असलेल्या या गावाचा इतिहासही तेवढाच दिमाखदार आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून कडव्या सैनिकांचा गाव म्हणून हा प्रसिद्ध आहे. आजही या गावातील जवळपास ६० टक्के घरातील मंडळी ही लष्करी सेवेत आहेत. सैनिकांचा गाव म्हणून रत्नागिरीतील शिवतर जसे प्रसिद्ध आहे तसेच सिंधुदुर्गातील सावंतवाडी तालुक्यातील चौकुळ गावही प्रसिद्ध आहे. या गावातील ४०० हून अधिक लोक निवृत्त सैनिक आहेत, तर चौकूळचे १३० हून अधिक सुपुत्र सध्या लष्करीसेवेत आहेत. चौकुळ गाव जसा वैशिष्ट्यपूर्ण आहे तशीच या गावातील सैनिकांची यशोगाथा पाहता ऐतिहासिकही आहे.

या गावातील अनेक पिढया कधी युद्धासाठी तर कधी लष्करातील सेवेसाठी परभागातच राहिल्या. मात्र पिढयान् पिढया सैनिकांचा वारसा गावाने सोडला नाही. गावच्या शंभर वर्षाच्या इतिहासाचे दस्ताऐवजही याला साक्षी आहेत.चौकुळ गावात आजची सर्व पुरातन परंपरा आणि धार्मिक कार्यक्रम हे पाहू शकता. विशेष म्हणजे, दर मंगळवारी सुट्टी घेतो. या दिवशी गावातील ग्रामस्थ शेतात जात नाहीत. परंपरागत कामात ते व्यस्त राहत नाहीत. या दिवशी सर्व जण गावाची ग्रामदेवता सातेरी देवीच्या मंदिरात जमतात.मनोभावे देवीची पूजा करतात. गावात कुणाचे उणेदुणे असेल तर यावेळी गावातील तंटे गावातच सोडविले जातात. देवीच्या साक्षीने निर्णय घेतला जातो. आज तंटामुक्त अभियान या गावात राबविले जात आहे.

वनऔषधींचा खजीना आणि गायी-वासरांसाठी कुराणबंदी!

आंबोलीपासून जवळच असणा-या या गावात वनऔषधींचा अमूल्य खजीना आहे. हरतऱ्हेच्या दुर्मीळ वनस्पती या भागात आहेत. पिढयान् पिढया गायी-वासरांसाठी खास शेतीक्षेत्र राखीव ठेवण्यात आले आहे.तत्पूर्वी अनेक पिढया ही परंपरा चौकुळमध्ये सुरु आहे. या गावातील ग्रामदेवतेच्या मंदिराच्या प्रांगणात धुपाचे झाड आहे. महाराष्ट्राच्या अन्य भागात असे धुपाचे झाड कोठेही नाही. यामुळे या झाडावर संशोधन करत पुणे येथील काही जैवतज्ञानी या धुपाच्या झाडांची कलमे तयार करण्याचा प्रयत्न केला. यासाठी धुपाच्या झाडाची बी नेऊन त्यावर संशोधन करण्यात आले. आता ही नवीन रोपे तयार करण्यात आली असून त्याची लागवड करण्यात येत आहे.आश्चर्य घटप्रभेचेघटप्रभा नदीचा उगम आंबोलीत झाला असला तरी ती चौकुळमध्ये बाळसे धरते. हसते, फुलते आणि मग सह्याद्रीच्या कुशीने कर्नाटकाकडे रवाना होते. या नदीने कर्नाटकाचा बहुतांश भाग सुजलाम् सुफलाम केला आहे. हा गाव बाराही महिने धुक्यातच असतो. जणूकाही स्वर्गात असल्याचा आनंदच हा गाव देत असतो.चौकुळ गावाबद्दल जाणून घेण्यासाठी नक्की एकदा भेट द्या!

# माऊली मंदिर







## दत्त मंदिर



आंबोली गावाच्या मध्याभागी श्री देवी माऊली देवीचे मंदिर असून या मंदिराचे बांधकाम पुरातन स्वरुपाचे आहे. खिडक्या - दरवाजे कमानी सारखे आहे. सभामंडप देवीचा गाभारा या मंदिरात जत्रोत्सव, होळी, सप्ताह, नवरात्रोत्सव इत्यादी उत्सव साजरे केले जातात. माहेरवाशीण मुलीची नवस बोलण्याची परंपरा मोठी आहे. या मंदिराच्या बाजूला औदुंबराच्या छायेत दत्त मंदिर असून या मंदिराची स्थापना सन १९९९ मध्ये करण्यात आली आहे.

## गावडे वस





दत्त मंदिर



सिद्धेश्वर मंदिर



महारवस (दांडेकर मंदिर)



गिरोबा मंदिर



माऊली मंदिर, गावठणवाडी



गाव चव्हाटा मंदिर



पुर्वीचा वस मंदिर

पूर्वीचा वस मंदिरआंबोली घाटातील महत्वाचे असे हे जागृत देवस्थान आहे. घाटमार्ग बांधण्याआधी येथूनच पायवाटेने पारपोली मार्गे प्रवास केला जात असे. हे जुने आणि ऐतिहासिक असे स्थान आहे. घाटमार्गातून प्रवास करणारे प्रवासी, वाहन चालक व पर्यटक नेहमी दर्शन घेत पुढील प्रवास करतात. तर याच परिसरात आंबोली सनसेट पॉइंट देखील असून सूर्यास्त दर्शन येथून केले जाते.

आंबोलीतील हिरण्यकेशी नदी काठी तथा हिरण्यकेशी पासून २ किमी अंतरावर राघवेश्वर श्री प. पु. भारतदास महाराज यांचा मठ आहे. येथे प. पु. भारतदास महाराज राघवेश्वर येथे सुमारे १२ वर्ष तप करत ह्या भूमिला पवित्र बनवले आहे. येथे श्री राम मंदिर असून श्री राम, श्री लक्ष्मण, श्री सीता माता, श्री हनुमान विराजमान आहेत. तसेच हनुमान मंदिर आहे. येथे प. पु. भारतदास महाराज यांनी श्री राम मंदिरात श्री सत्य नारायन पूजा ही दर शनिवारी सुरू केलेली असून ती अद्यापही अखंड चालू आहे. राघवेश्वर येथे हिरण्यकेशी नदीत स्वयंभु गणेश मंदिर आहे. तसेच प. पु. भारतदास महाराज यांचे समाधी मठ देखील आहे. याठिकाणी श्री राम जयंती, हनुमान जयंती, महाशिवरात्र, हरिनाम सप्ताह, प. पु. भारतदास महाराज यांची पुण्यतिथि आदी उत्सव साजरे केले जातात. येथे महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक आदी राज्यातून असंख्य भक्त येतात. येथे आपल्यास आध्यात्मकाची अनुभूति मिळते. हे ठिकाण आंबोली मुख्य रस्त्यापासून २ किमी वर आहे.



राघवेश्वर मंदिर








हिरण्यकेशी तीर्थक्षेत्र हे जागतिक स्तरावरील एक धार्मिक तथा पवित्र क्षेत्र असे आहे. सह्याद्रीच्या सर्वात मोठ्या डोंगरारील गुहांमधून पवित्र हिरण्यकेशी नदीचा उगम हा पूर्वे कडूनच होतो. नदीच्या उगमस्थानी पवित्र शिवलिंग, श्री गणेश, हिरण्यकेशी देवी (गंगा) आहे. बाजूलाच श्री दत्त व गौमाता आहे. पावसाळ्यात हिरण्यकेशी नदी जणू महादेवांना अभिषेक करते असे दृश्य डोळ्यांचे पारणे फेडते. तर बारमाही हा परिसर एक अद्भुत पावित्र्याची आणि आध्यात्मकाची अनुभूति देतो. असच काही. दरवर्षी असंख्य भाविक व पर्यटक येथे भेट देतात. श्रावण महीना, महाशिवरात्रीला येथे हजारोंच्या संख्येने भाविक दर्शनाला येतात. येथे धार्मिक कार्यक्रम ही होतात. तर हिरण्यकेशी नदीवर लाखो जिव अवलंबून आहेत. याच नदीत २ किमीवर राघवेश्वर येथे स्वयंभू श्री गणेश मंदिर. तर आजरा (जि.कोल्हापुर) येथे ऐतिहासिक महादेवांचे मंदिर आहे. तर त्रेतायुगात श्री राम वनवासा दरम्यान माता सीता व लक्ष्मण यांचे पदस्पर्श झालेले तथा वास्तव्य असलेले श्रीक्षेत्र 'रामतीर्थ' आहे. येथे पुरातन श्री राम मंदिर, हनुमान मंदिर आहे. त्यामुळे ह्या नदीला अजुनच दिव्य महत्व प्राप्त झालेले आहे. तसेच काशीचे महत्व असल्याने येथे हस्थी विसर्जन ही होते. पूर्वी जंगलाला अरण्य संबोधले जायचे तर हस्थी विसर्जनामुळे काशीचे महत्व असल्याने पुरातन काळी 'अरण्यकाशी' ला कालंतराने 'हिरण्यकेशी' अशी ओळख ह्या तीर्थक्षेत्राला झाली असेल असेही काही तर्क! तर हिरण्यकेशी येथे उजव्या बाजूच्या गुहेच्या पहिल्या टप्प्यात जाता येत. साल १९८१ मधे श्री अंक पुणे येथील काहीजण ऑक्सिजन घेऊन गुहांचा आणि उगमाचा शोध घेण्यास सह्याच्या गुहेच्या ७ व्या टप्प्या पर्यंत गेले होते. त्यावेळी अद्भुत दृश्ये सह विविध रंगाचे पाण्याची (जे बहुदा मातीचा रंगामुळे) कुंडे दिसून आलीत. ७ व्या टप्प्यात सोनेरी पाणी आणि मोठी जागा दिसून आली. मात्र, त्यांच्या जवळ ऑक्सिजन प्रमाण अल्प असल्याने ते माघारी आलेत. आणि बाहेर येताच ते अद्भुत नजारे स्थानिक त्यावेळी उपस्थित असलेल्यांना सांगितले. त्यानंतर ते आजवर त्या गुहांमधे कोणी गेले नाही. हे विशेष!



श्री राम मंदिर

आंबोलीतील पुरातन मंदिरा पैकी एक असे हे श्री राम मंदिर आहे. तर समोरच मारुती मंदिर सुद्धा आहे. मंदिरात श्री राम, लक्ष्मन व माता सीता विराजमान असून ह्या मंदिरा पासून काही मीटर अंतरावरून आंबोली घाट आरंभ होतो. तसेच श्री राम मंदिर समोर शेकडो वर्षा पूर्वीचे पुरातन असे श्री दत्त मंदिर सुद्धा आहे. बाजारवाडी परिसरात हे मंदिर असून येथे दरवर्षी धार्मिक व पारंपारिक विविध कार्यक्रम हे पार पडतात. येथे असंख्य भाविकांसह पर्यटकही भेट देतात!



मुळवंदवाडी लिंगाची राय



मलाई पठार




वेंगुर्ला - बेळगाव मुख्य रस्ता येथे जागृत नांगरतासकारी देवस्थान आहे. आंबोली परिसरातील तसेच आजू - बाजूच्या गावातील स्थानिकांची नांगरतासकारी देवस्थानावर श्रद्धा आहे. तर आंबोली मार्गे बेळगाव दिशेला प्रवास करणारे प्रवासी व वाहन चालक हेही नांगरतासकारी देवाचे दर्शन घेऊन पुढील प्रवास करतात! हे मंदिर अतिशय सुंदर असून मंदिराच्या मागच्या बाजूला आश्चर्यकारक असा अद्भुत धबधबा आहे. हा धबधबा बाराही माही प्रवाहित असतो. ह्या धबधब्याचे पाणी हे खडकाला चिरत शेकडो फूट खाली चिंचोळ्या आकाराच्या दरित कोसळतो. पावसाळ्यात धबधब्याला पाणी मिळणाऱ्या ओहोळ हा पूर्ण क्षमतेने प्रवाहित असल्याने नांगरतास धबधबा याचे आपल्याला रौद्र रूप पहाता येते. हा धबधबा पाहणे एक रोमांच असतो.

जैवविविधतेने परिपूर्ण असा आंबोलीतील पुरातन आणि आध्यात्मकाची अनुभूति देणारा "लिंगदेव राई" असा परिसर आहे. येथे पुरातन महादेवांचे मंदिर असून शिवलिंग, नंदी, श्री गणेश आदी विराजमान आहेत. श्री देवी भावई, श्री देवी सातेरी यांचीही बाजूलाच मंदिरे आहेत. तसेच इतरही देवांची मंदिर ह्या परिसरात आहेत. हे मंदिर जागृत मंदिर असल्याने दर सोमवारी, श्रावण महीना, महाशिवरात्रि तसेच इतर सनात भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळते. तर आंबोलीतील ह्या श्री लिंगदेव राई मधे वनौषधींचा जणू खजानाच सापडतो. सोबत दुर्मिळ व अतिदुर्मिळ वन्यजीव यांचाही वास आढळून येतो. असे हे ठिकाण आहे.





# शहिद पांडुरंग गावडे स्मारक

सिंधुदुर्ग जिल्हातील आंबोली गावचे राहणारे पांडुरंग महादेव गावडे 21 सप्टेंबर 2001 मराठा लाईट इन्फट्री मध्ये देशाची सेवा करण्यासाठी भरती झाले होते. 2015 मध्ये त्यांना 41 राष्ट्रीय रायफल्स युनिट मध्ये तैनात करण्यात आले होते. तिथे त्यांनी कुपवाडा जिल्हातील विश्वासघातकी भागात अनेक दहशतवादी कारवाई मध्ये भाग घेतला होता असेच एक काश्मीरमधील कुपवाडा जिल्हातील दुर्गमुल्ला गावात 22 मे 2016 रोजी जंगल परिसरात आसरा घेतलेल्या दहशतवाद्यांचा खात्मा करण्यासाठी शनिवारी ४१ राष्ट्रीय रायफल्सचे जवान धावून गेले होते. दहशतवाद्यांच्या गोळीबार व बॉम्बहल्ल्याला तब्बल नऊ तास निकराने सामोरे जात या जवानांनी पाचही दहशतवाद्यांना कंठस्नान घातलं होतं. या चकमकीत नायक पांडुरंग गावडे गंभीर जखमी झाले होते. उपचारादरम्यान श्रीनगरच्या लष्करी रुग्णालयात त्यांची प्राणज्योत मालवली होती.

लष्कराच्या पाच दहशतवाद्यांना लढताना हुतात्मा झालेल्या शहिद नायक पांडुरंग गावडे यांना 68 व्या प्रजासत्ताक दिनाच्या पुर्व संध्येला भारत सरकार कडून मरोणोपरांत शौर्य चक्र सन्मानाने राष्ट्रपतीच्या हस्ते भुषविण्यात आले.

## १) सदाशिव महादेव भिसे
स्वातंत्र्य सैनिक

## २) पांडुरंग महादेव गावडे
शौर्य चक्र वीर

## ३) रामचंद्र बुधाजी गावडे
शहीद जवान

## ४) भिसाजी गुंडू गावडे
शहीद जवान

"मातृभूमिची स्वतंत्र्यता आणि तिचा गौरव यांच्या रक्षणाकरीता बलिदान दिलेला वीरांना शतशः नमन"

माजी सैनिक वेलफेअर संस्था, आंबोली
ग्रामपंचायत आंबोली



परिक्षीत पॉईंट

आंबोली व सुळेरान या ठिकाणी तुतीरेशीम पैदास केंद्र आहे. हे महाराष्ट्र शासनाचे उद्योग आहे. आंबोलीमध्ये अंडी पूंज निर्मिती केंद्र आहे. रेशीमसाठी जी अंडी लागतात ती या ठिकाणी तयार केली जातात व महाराष्ट्र - कर्नाटकात शेतकऱ्याना दिली जातात. आंबोली व सुळेरान या ठिकाणी बरीच तुती लागवड आहे. या ठिकाणी कोष पण तयार करतात ग्रीनीज, रेरींग, फिडींग असे त्यांचे प्रोसेस आहे. मुख्य प्रोसेस म्हणजे अंडी तयार करणे. तयार केलेले कोष बेंगलोर - नागपूरला पाठवितात,

आंबोलीमधील सर्वात उंच टेकडीवरचा हा पॉईंट आहे. या परिक्षीत पॉईंटवरुन आपण दृष्टीक्षेप जर केला तर आपल्याला पूर्ण आंबोलीचे दर्शन होते. दुसऱ्या बाजूला पाहिले तर चौकूळ गांव आपल्याला दिसतो. चौकूळ हा गाव आंबोलीपासून जवळच १० कि. मी. अंतरावर आहे. चौकूळ हे निसर्गरम्य गाव आहे. चौकूळच्या जंगलात गवे, अस्वल, बिबट्या, भेकर, हरीण असे वन्य प्राणी आहेत.परिक्षीत पॉईंटवरुन जास्त निरिक्षण केल्यास आपल्याला गोवा दृष्टीस पडते. आंबोली वनउद्यान मधून सरळ रस्ता परिक्षीत पॉईंटकडे गेला आहे.आपण हा पॉईंट पाहिल्यानंतर लगेच सरळ खाली उतरा सरळ पश्चिमेकडे चला पुढे आपल्याला चौकूळला जाणारा रस्ता दिसेल. हे गवेरेडे यांचे राहण्याचे स्थान. आपल्याला वन्यप्राण्याचे दर्शन घ्यायचे असेल तर या ठिकाणी आपल्याला यायलाच पाहिजे!



तुती रेशीम केंद्र

# पंचक्रोशी शिक्षण प्रसारक, आंबोली
## ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग




पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ आंबोली ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग अंतर्गत युनियन इंग्लिश स्कूल आंबोली या शाळेची स्थापना सन १९६१ मध्ये झाली. शाळा स्थापन झाल्यापासून आजपर्यंत आमची शाळा अतिशय चांगल्या पद्धतीने चालू आहे.

आमच्या शाळेमधून आत्तापर्यंत अनेक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी शाळेमध्ये चांगली सेवा देवून सेवानिवृत्त झाले आहेत. सध्याचे सर्व कर्मचारी अतिशय झोकून देवून काम करीत आहेत. शाळेची गुणवत्ता वाढीसाठी सर्व कर्मचाऱ्यांची कायम धडपड दिसून येते.

आमच्या शाळेमध्ये NTS, NMMS, स्कॉलरशीप यासारख्या परीक्षांना दरवर्षी बसतात व चांगले यश संपादन करतात. इयत्ता दहावीचा निकाल बऱ्याच वर्षांपासून आत्तापर्यंत १००% लागत आहे. आमच्या शाळेमध्ये दरवर्षी खेळ, निबंधस्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा यांसारखे विविध उपक्रम घेतले जातात व त्याचे योग्य मार्गदर्शन केले जाते.

आमच्या शाळेसाठी झटणारे संचालक मंडळ, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, पालक माझी विद्यार्थी हे सर्व शाळेची गुणवत्ता वाढीसाठी कायम प्रयत्न करीत असतात.

### संचालक मंडळ

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. गावडे प्रकाश अनंत | अध्यक्ष |
| २) | श्री. नार्वेकर अशोक नागेश | उपाध्यक्ष |
| ३) | श्री. गावडे महादेव विष्णू | सेक्रेटरी |
| ४) | श्री. सावंत दिलीप महादेव | कोषागार |
| ५) | श्री. डिसोजा कोजमा जुझे | संचालक |
| ६) | श्री. गावडे शशिकांत सोनू | संचालक |
| ७) | श्री. गुरव प्रकाश शंकर | संचालक |
| ८) | श्री. परब विजय कृष्णा | संचालक |
| ९) | श्री. चव्हाण विष्णू धोंडी | संचालक |
| १०) | श्री. राऊत यशवंत झिलू | संचालक |

### युनियन इंग्लिश स्कूल, आंबोली - शिक्षक कर्मचारी

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. विठ्ठल आप्पा मोरे | मुख्याध्यापक |
| २) | श्री. सावंत दत्ताराम पुरुषोत्तम | सह शिक्षक |
| ३) | श्री. गावडे बाळा जयराम | सह शिक्षक |
| ४) | श्रीम. कांबळे भारती भरमू | सह शिक्षिका |
| ५) | श्री. बागुल भरत शिवाजी | सह शिक्षक |
| ६) | श्री. लवटे बाळासो आळासो | सह शिक्षक |

### शिक्षकेतर कर्मचारी

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. पालेकर आत्माराम वामन | वरीष्ठ लिपीक |
| २) | श्रीम. गावडे संगीता संजय | प्रयोगशाळा सहाय्यक |
| ३) | श्रीम. पांगम नेहा गोविंद | ग्रंथपाल |
| ४) | श्री. चव्हाण शंकर धोंडी | शिपाई |



**श्री. पालेकर आत्माराम वामन**
माजी. जि. प. शिक्षण सभापती

संस्थेमध्ये कार्यरत असतानाच आंबोलीच्या सामाजिक क्षेत्रात ज्या व्यक्तींचे नाव त्यांनी केलेल्या कार्यामुळे घेतले जाते ते म्हणजे माजी शिक्षण व आरोग्य सभापती श्री. आत्माराम वामन पालेकर.

त्यांच्या समजाकार्याची सुरुवात ही सहकार क्षेत्रातून होते. ते दूध डेअरी, पतसंस्था स्थापन करुन आंबोलीत सहकार चळवळीत योगदान देण्याचे काम करत आहेत. राजकीय क्षेत्रात आदी ग्रामपंचायत सदस्य नंतर पंचायत समिती सभापती व नंतर सिंधुदुर्ग जि. प. शिक्षण व आरोग्य सभापती पद भूषविले.

केंद्रीय मंत्री मा. ना. श्री. नारायण राणे यांचे विश्वासू व्यक्तीमत्व म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांना माजी आमदार श्री. राजन तेली यांची नेहमीच सहकार्याची भूमीका असते.

सर्व पर्यटकांचे हार्दिक स्वागत

# भास्कर ज्वेलर्स

सोने चांदीचे दागिने तयार करुन मिळतील



**प्रोप्रा. उल्हास भा. पनवेलकर**

**9421145375 / 9405145375**

चौकुळ, आंबोली, ता. सावंतवाडी

# हॉटेल आदर्श

**निसर्गाच्या सानिध्यात....**

**सर्व सोयिनियुक्त हॉटेल आदर्श....**

## ROOMS AVAILABLE




**प्रोप्रा. ज्ञानेश्वर वासुदेव राऊत**

**9049845803 / 9403071475**

email : adarshahotelamboli@gmail.com

*सर्व पर्यटकांचे हार्दिक स्वागत*

|| श्री || शिवमल्हार ||

प्रोप्रा. काका भिसे

8007121517 / 7588447161

# लाकडी खेळणी विक्रेते





२०० हून अधिक आकर्षक लाकडी खेळणी

काजू, कोकम सरबत, कोकणी मेवा, मालवणी मसाले, दाभोलकर पेंटीगज्, आंबोलीतील शुद्ध मध मिळेल.

पोलिस स्थानकाजवळ, आंबोली, ता. सावंतवाडी ४१६५५०

---

CHEMIST & DRUGGIST

# श्री राम मेडीकल

सर्व प्रकारची औषधे मिळतील मेडीकल अॅण्ड जनरल स्टोअर्स

प्रोप्रा. गावडे ब्रदर्स, मोबा. ९४२३८२०९९९

---

|| श्री देवी सातेरी, भावई प्रसन्न ||



# हॉटेल सैनिक ढाबा

प्रोप्रा. रुपेश गावडे, ९८६५०२३८३१ / ८००७४३५७४५

एच.पी. पेट्रोल पंपच्या समोर, सावंतवाडी-बेळगांव रोड, आंबोली

## जिल्हा परिषद सिंधुदुर्गच्या प्राथमिक शाळा व अंगणवाडी

| शाळा | अंगणवाडी |
| --- | --- |
| जि. प. पू. प्राथमिक शाळा बाजारवाडी | अंगणवाडी बाजारवाडी |
| जि. प. पू. प्राथमिक शाळा जकातवाडी | अंगणवाडी जकातवाडी |
| जि. प. पू. प्राथमिक शाळा गावठणवाडी | अंगणवाडी गावठणवाडी |
| जि. प. पू. प्राथमिक शाळा कामतवाडी | अंगणवाडी कामतवाडी |
| जि. प. पू. प्राथमिक शाळा मुळवंदवाडी | अंगणवाडी मुळवंदवाडी |
| जि. प. पू. प्राथमिक शाळा सतिचीवाडी | अंगणवाडी सतिचीवाडी |
| जि. प. पू. प्राथमिक शाळा फणसवाडी | अंगणवाडी फणसवाडी |
| जि. प. पू. प्राथमिक शाळा नांगरतास | अंगणवाडी नांगरतास |

✲ ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत आंबोली
श्री. संदीप गोसावी – ८४१२८४३१७३

✲ प्राथमिक आरोग्य केंद्र
डॉ. पाटकर व डॉ. जाधव – ८०८०७४९८६५/८९७५६१०६८२

✲ तलाठी श्री. घाडीगावकर – ७०६६८११८६९
कोतवाल – श्री. लाडू गावडे – ९४२३५१२६३७

✲ पोलिस दूरक्षेत्र आंबोली
श्री. दत्ता देसाई – ९४२३३००३३०/९९७०२२२७४५

✲ वित्तीय संस्था
बँक ऑफ इंडीया – ७३०६७२७७२६
सि. जि. म. स. बँक – ०२३६३–२४०२०६

### पत्रकार

१) विष्णू चव्हाण – ज्येष्ठ पत्रकार
२) अनिल चव्हाण – सकाळ
३) महादेव भिसे – लोकमत
४) निर्णय राऊत – पुढारी
५) विजय राऊत – तरुण भारत

## प्रमुख गावकर मंडळी



श्री. शशिकांत सोनू गावडे
चेअरमन आंबोली वि. सोसायटी

- लक्ष्मण गावडे
- सखाराम गावडे
- शंकर नाटलेकर
- गुंडू पारधी
- एकनाथ सुतार
- दशरथ जाधव
- श्रीकांत गावडे
- रामा रुपा गावडे
- विलास गावडे
- गणपत गावडे
- यशवंत गावडे
- सोमा गावडे
- तानाजी गावडे
- विजय गावडे
- कानोजी गावडे
- दशरथ गावडे
- गंगाराम गावडे
- गुणाजी गावडे

## आंबोली विविध कार्यकारी सेवा सोसायटी

आंबोलीतील स्थानिक भूमीपूत्रांना शेतीच्या माध्यमातून आर्थिक सुबधता आणण्यासाठी मोठ्या प्रमाणात योगदान हे आंबोली विकास सोसायटीच्या माध्यमातून होत आहे. लवकरच तिथे नव्या सुसज्य इमारतीत रुपांतर होणार आहे. असा मानस संचालक कार्यकारणी मंडळाचा आहे.

१) चेअरमन – मा. श्री. शशिकांत गावडे
२) व्हाईस चेअरमन – मा. श्री. महादेव गावडे
३) संचालक तथा माजी चेअरमन – श्री. रामचंद्र गावडे
४) संचालक – •भिमसेन गावडे •चंद्रकांत गावडे •विकास गावडे •मनोहर बंड •विठ्ठल सरमळकर •उमेश पडते •नमिता राऊत •दिव्या सावंत • मधू यमकर •शंकर चव्हाण

✲ श्री. कांबळे (सचिव) – ९९२३६२६६३१

## ग्रामपंचायत आंबोली कार्यकारणी

| अ. क्र | सभासदाचे नाव | पद | मोबाईल क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | श्रीम. सावित्री वामन पालेकर | सरपंच | ९१५८५२४४५६ |
| २ | श्री. सदाशिव वसंत नार्वेकर | उपसरपंच | ९६०७२११२६१ |
